जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- / ११५ /२०१५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- २८.१२.२०१५

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## सर्वसाधारण सभेची सूचना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची 'ड' चे प्रकरण-2 मधील नियम क्र.1 अन्वये

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे अनुसूचि (ड) चे प्रकरण 2 मधील नियम क्र .१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापौर **सौ.शैलजा किशोर स्वामी** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दि.५.१.२०१६ रोजी दुपारी ३.०० वा.** नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै .शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

महापौर,
.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति
श्री/श्रीमती ------------------------------------------------------------
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## कार्यक्रम पत्रिका

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |
| ११ | नोंव्हेबर | | | | |
| | एकूण | | | | |

**विषय क्र.२**

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाबत संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्यातील सर्वसाधारण सभेच्या विषय सूचीवर कायमस्वरुपी समावेश करुन या विषयाचा सविस्तर आढावा सभेमध्ये घेण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर

**विषय क्र.३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील शांतता क्षेत्र अधिसुचित करण्यात आली असून त्याअनुषंगाने शांतता क्षेत्र अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली त्यची नोंद घेणे बाबत.

**विषय क्र. ४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे सुधारीत कलम 31(अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज अधिनियमातील 4-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर नामनिर्देशनानुसार 11 (अकरा) सदस्याची नियुक्ती करणे बाबत.

**विषय क्र.५**

**नांदेड** वाघाळा शहर महानगरपालिकेकडून 1) व्हीआयपी रोडवर 2) केळी मार्केट, इतवारा 3) पक्की चाळ या तीन ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधलेली असून ती चालवण्यासाठी संस्थाचालकांना भाडेपट्टीवर देण्यात आलेली आहेत आणि बीओटी तत्वावर बांधण्यात आलेले सार्वजनिक शौचालये खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1) रिजनल वर्कशॉप | 2) शिवाजीनगर दवाखाना |
| 3) गोकुळनगर | 4) तरोडेकर मार्केट, वजिराबाद |
| 5) महाराजा रणजितसिंघ मार्केट | 6) चौफाळा गार्डन |
| 7) तरोडा नाका | 8)मध्यवर्तीबसस्थानक,उड्डाणपुलाखाली |
| 9) कलामंदीरच्या पाठीमागे | 10) जुना मोंढा टॉवर (दोन जागी) |
| 11) जकात नाका | 12) अण्णाभाऊ साठे, व्हीआयपी रोड |
| 13) देगलूर नाका पुलीस चौकीजवळ | 14) इतवारा जिल्हा परिषद शाळेजवळ |
| 5) सिडको उद्यानाजवळ | 16) नंदीग्राम मार्केट वजिराबाद |
| 17) तिरंगा चौक वजिराबाद | 18) बंदाघाट |
| 19) रेल्वेस्टेशन सिटीबस स्टॉप जवळ | 20) दयानंदनगर |

या सर्व शौचालयापैकी काही 20 व 10 वर्षासाठी निविदा पद्धतीने जागेचे भाडे घेऊन संस्था चालकांना बीओटी तत्वावर शौचालय बांधून चालवण्यासाठी देण्यात आलेली आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत पन्नास हजार फिरती लोकसंख्या असल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी व आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाद्वारे महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालये नागरिकांसाठी एकूण 522 टॉयलेट सिट्सची आवश्यकता आहे. त्यापैकी आजमितीस एकूण 214 टॉयलेट सिट्स उपलब्ध आहेत आणखी 308 टॉयलेट सिट्सचे बांधकाम करावयाचे असून त्यापैकी पुरूषांकरिता 120 टॉयलेट सिट्स व महिलांकरिता 188 टॉयलेट सिट्स बांधायचे आहेत.

तरी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची लोकसंख्या व फिरती लोकसंख्येचा विचार केला असता बीओटी तत्वावर मुख्य रस्त्याच्या बाजूस फूटपाथवर 25 ठिकाणी सार्वजनिक शौचालयासाठी जागा प्रस्तावित करून सदरील शौचालयास ड्रेनेज जोडणी व नळ जोडणी देऊ शकता येईल काय ? याचा अहवाल कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व मलनि:सारण विभाग यांचे कडून घेतला असता त्यांनी खालील ठिकाणी नळ व ड्रेनेज जोडणी देऊ शकता येईल असा अहवाल दिला आहे.

| | |
|---|---|
| 1) नमस्कार चौक | 2) बाफना टी पॉइंट |
| 3) चिखलवाडी कॉर्नर | 4) नगीणाघाट |
| 5) गोवर्धनघाट | 6) चैतन्यनगर महादेव मंदीर |
| 7) भावसार चौक तरोडा खु. | 8) दधीची मार्ग, शिवाजीनगर |
| 9) गणेश नगर वाय पॉइंट | 10) पाण्याची टाकी खडकपुरा |
| 11) आनंदनगर चौक | |

तसेच शहरात विविध 8 ठिकाणी फक्त महिलांसाठी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करणे प्रस्तावित आहेत.

1) वजिराबाद येथील बंजारा हॉटेलसमोर (पुर्वीची पडलेल्या पाण्याच्या टाकीची जागा )

2) आयुर्वेदिक कॉलेजच्या फुटपाथवर
3) आयटीआय ते स्नेहनगर फुटपाथवर

4) विद्यानगरच्या समोर फुटपाथवर
5)श्यामनगर दवाखाना जवळील फुटपाथवर

6) जुना मोंढा ते बर्की चौक 7) श्रीनगर पंचशील ड्रेसेसच्या बाजुला

8) घामोडीया फॅक्ट्री, डॉक्टर लेन, डॉ.मापारे यांच्या दवाखान्याच्या बाजुचे मोकळ्या जागेवर (open space)

वरील ठिकाणी बीओटी तत्वावर 20 वर्षासाठी सार्वजनिक शौचालये दैनिक वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिद्ध करून मा. आयुक्त हे ठरवितील त्या नियम व अटीप्रमाणे भाडेपट्टीवर संस्था चालकांना देणेसाठी शहरातील जागेच्या आवश्यकतेनुसार बीओटी तत्वावर सार्वजनिक शौचालय महानगरपालिका हद्दीत बांधून चालवण्यास मान्यता देण्याचा अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देणेचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**प्रशासकीय टिपण्णी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने बांधलेली तीन व BOT तत्वावर बांधुन चालविण्यास दिलेली 20 सार्वजनिक शौचालय कार्यरत आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत पन्नास हजार फिरती लोकसंख्या असल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी व आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाद्वारे महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालये नागरिकांसाठी एकूण 522 टॉयलेट सिट्सची आवश्यकता आहे. त्यापैकी आजमितीस एकूण 214 टॉयलेट सिट्स उपलब्ध आहेत आणखी 308 टॉयलेट सिट्सचे बांधकाम करावयाचे असून त्यापैकी पुरूषांकरिता 120 टॉयलेट सिट्स व महिलांकरिता 188 टॉयलेट सिट्स बांधायचे आहेत.

तरी आणखी BOT तत्वावर बांधुन चालविण्यासाठी 11 सार्वजनिक शौचालय व महिलांसाठी 8 स्वतंत्र सार्वजनिक शौचालय प्रस्तावित करण्यात येत असुन आणखी ज्या ठिकाणी आवश्यक असेल व जागेच्या उपलब्धते नुसार BOT तत्वावर मान्यता देण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देणे बाबत चा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.६** प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरालिका २०१५-२०१६ करीता मालमत्ताधारकाना मालमत्ता कराचे मागणी बिल ई-गर्व्हनन्स व्दारे नव्याने अमलबजावणी करण्यात येत असल्याने मालमत्ताधारकाना मागणी बिल मिळण्यास वेळ लागला त्यामूळे मालमत्ता व पाणी करातील शास्ती माफ करण्यासंदर्भात चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक :-** शफि अहेमद कुरेशी **अनुमोदक :-** विरेंद्रसिंघ गाडीवाले

**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**महापौर,**
.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.